GREENLAWNS SCHOOL , WORLI

वार्षिक परीक्षा (द्वितीय-सत्र २३-२४)

इयत्ता - ५ वी | पूर्णांक - ८०

दिनांक - १३-२-२४ | विषय - <u>मराठी</u> | वेळ - २ तास

---

<u>सूचना</u> :- सगळे प्रश्न अनिवार्य आहेत.

शुध्द भाषा व सुवाच्य लेखन अपेक्षित आहे.

---

<u>विभाग – अ</u>

<u>भाषा - विभाग ( अंक – ४०)</u>

प्रश्न १] खालीलपैकी <u>एका</u> विषयावर निबंध लिहा : - (८)

i) छत्रपती शिवाजी महाराज

ii) माझा आवडता सण

iii) आमची सहल

प्रश्न २] खालील उतारा वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा :-

एक जंगल होते. या जंगलात ससा व कासव राहत होते. त्यांची खूप जवळची मैत्री होती.एकदा दोघांची पळण्याची शर्यत लागली. ससा फार गर्विष्ठ होता. त्याला वाटे आपल्यासारखे कोणीच वेगाने पळू शकत नाही. शर्यतीचा दिवस ठरला. ठरलेल्या ठिकाणाहून शर्यत सुरू झाली. कासव हळूहळू चालत होते. ससा कासवाकडे बघून हसून केव्हाच पुढे निघून गेला. पुढे गेल्यावर सशाला हिरवेगार गाजराचे शेत दिसले. त्याला गाजरे खावीशी वाटली. त्यांनी शेतात जाऊन पोटभर गाजरे खाल्ली. त्याला आता झोप येऊ लागली. त्याने मागे पाहिले कासव त्याला काही दूरपर्यंत दिसेना. त्याने विचार केला , कासव मला काय गाठणार ? थोडा वेळ डुलकी घ्यावी. ससा तिथेच गाढ झोपी गेला. कासव आपल्या गतीने तेथे आले. सशाला झोपलेले त्याने पाहिले. त्याला न उठवता ते आपल्या मार्गाने जाऊ लागले. बऱ्याच वेळाने सशाला जाग आली. ससा वेगाने पळाला. शर्यत संपण्याच्या ठिकाणी आला. कासव त्याच्या आधीच तेथे हजर होते. ससा ते पाहून खजिल झाला. कासवाने सशाला हरवले होते.

प्रश्न :

i) ससा व कासव यांच्यात खूप काय होती ? (१)

ii) एकदा दोघांची कसली शर्यत लागली ? (१)

iii) कासव कसे चालले होते ? (१)

iv) पुढे गेल्यावर सशाला काय दिसले ? (१)

v) ससा कसा झोपला होता ? (१)

vi) सशाला नेहमी काय वाटे ? (१)

vii) सशाने थोडा वेळ काय घेतली ? (१)

viii) ससा कसा होता ? (१)

## व्याकरण विभाग

प्रश्न ३-अ] खालील दिलेल्या निर्देशानुसार उत्तरे लिहा: -

i) समानार्थी शब्द लिहा :- (३)

a) मैत्रीण - b) कथा - c) बैल -

ii) विरुद्धार्थी शब्द लिहा :- (३)

a) आवड - b) खरे - c) डावा -

iii) लिंग बदला :- (३)

a) मामा - b) बेगम - c) म्हैस -

iv) वचन बदला : - (३)

a) मी - b) छत्र्या - c) आरसा -

v) शाळेतील वस्तूंची कोणतेही दोन नावे लिहा. (२)

vi) तुम्हाला माहित असलेल्या धातूंची दोन नावे सांगा. (२)

vii) तुम्ही पाहिलेल्या दोन पक्ष्यांची नावे सांगा. (२)

आ) खालील वाक्यातील विशेषण ओळखून लिहा:- (३)

i) देवळात तीन घंटा आहेत.

ii) मला रंगीत पाटी हवी.

iii) राम हुशार मुलगा आहे.

इ ) खालील वाक्यातील क्रियापद ओळखून लिहा :- (३)

i) मीरा अभ्यास करते.

ii) कुंभार मडकी बनवतो.

iii) बाईंनी धडा शिकवला.

## विभाग - ब

## साहित्य-विभाग (अंक-४०)

## गद्य-विभाग

प्रश्न ४ ] अ) खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा : - (१०)

i) सहलीला जाताना मुलांनी काय - काय सोबत नेले होते ?

ii) नदीच्या पाण्याचा उपयोग लोक कशा-कशासाठी करतात ?

iii) मालतीने युक्ती करायचे का ठरवले ?

iv) बाईंनी 'आमराई' चा अर्थ काय सांगितला ? तसेच आमराई मध्ये मुले कोणते खेळ खेळली?

v) मलाण्णा डोक्याला हात लावून का बसला ?

आ) एका वाक्यात उत्तरे लिहा :- (४)

i) चोराची भंबेरी का उडाली ?

ii) फुलपाखराने मधमाशीचा कोणता चांगुलपणा सांगितला ?

iii) नदीचा जन्म कोठे होतो ?

iv) नदी आपल्याला कोणता संदेश देते ?

इ) खालील रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा : (४)

i)बाईने आम्हांला _________ काढायला सांगितली.

ii)माणसे ________ बांधून नदीला अडवतात.

iii)बैलाभोवती लोकांची _______जमली.

iv)सकाळी बागेत एक फुलपाखरू _______ फिरत आहे.

ई) कोण - कोणास म्हणाले ते लिहा : (४)

i) "या बैलाचे दोन्ही डोळे चांगले आहेत."

ii) " इतक्या घाईनं कुठे चाललीस ?"

iii) "या माणसाने आमचा बैल चोरला."

iv) "इतरांच्या डोळ्यांना तू सुख देतोस."

उ) शब्दार्थ लिहा : (३)

a) सहजासहजी - b) अडवणे - c)लगडलेले -

<u>पद्य-विभाग</u>

प्रश्न ५ ] अ)पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :-

i) बैलांना कसे सजवले आहे ? (२)

ii) 'छोटेसे बहीण भाऊ' या कवितेचे कवी कोण ? (१)

iii) मुलगी मोराला कोणत्या कमानीखाली नाचण्यास सांगते ? (१)

iv) बैल पोळ्याच्या दिवशी बैलांना काय खाऊ घालतात ? (१)

v) बैलांची नावे कोणती आहेत ? (१)

आ) कवितेच्या ओळी पूर्ण करा : - (४)

थेंब थेंब -------------------------

----------------------------------------------

-------------------------------

---------------------------------

----------------------------- नाच ॥

इ) शब्दार्थ लिहा :- (३)

a) दिन- b) स्वच्छ - c) मोर -

ई) जोड्या जुळवा :- (२)

| 'प्राणी' | 'घर' |
|---|---|
| i) मासा | a) झाड |
| ii) माकड | b) नगारखाना |
| iii) हत्ती | c) तबेला |
| iv) घोडा | d) पाणी |

समाप्त